|| जे का रंजले गांजले | त्यांसी करूया आपुले ||

श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडच्या उच्च शिक्षण मंडळ, कराडचे

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

राष्ट्रीय सेवा योजना (२०२४-२५)

## सूचना

दि. १२/०८/२०२४

सर्वाना सूचित करण्यात येते कि, गुरुवार, दिनांक १५/०८/२०२४ रोजी 3.00 वाजता मौजे किवळ येथे **‘एक पेड माँ के नाम’** या योजनेअंतर्गत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी राष्ट्रीय सेवा योजना विभ्गाच्या सर्व स्वयंसेवकांनी मौजे किवळ येथे जानेसाठी दुपारी २ वाजता वेळेत उपस्थित रहावे..

प्रभारी प्राचार्य,
वेणूताई चव्हाण कॉलेज,
कराड.

|| जे का रंजले गांजले | त्यांसी करूया आपुले ||

श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडच्या उच्च शिक्षण मंडळ, कराडचे

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

राष्ट्रीय सेवा योजना (२०२४-२५)

**एक पेड माँ के नाम (वृक्ष लागवड)**

## अहवाल-

श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडच्या उच्च शिक्षण मंडळ, कराडचे वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड मधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने गुरुवार, दिनांक 15 ऑगस्ट 2024 रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून **'एक पेड माँ के नाम'** या योजनेअंतर्गत 130 वृक्षांची लागवड मौजे किवळ, ता.कराड,जि. सातारा या गावामधील माळरानावर करण्यात आली. लागवड केलेल्या झाडांमध्ये वड, पिंपळ. चिंच, करंज, नारळ, सीताफळ, पेरू, चंदन, बेल यासारख्या झाडांचा समावेश होता. या कार्यक्रम प्रसंगी वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडच्या प्र. प्राचार्या. प्रा (डॉ.) एस आर सरोदे व केंद्रीय दिशा समिती, नवी दिल्ली च्या सदस्य व किवळ गावच्या महिला प्रतिनिधी मा. श्रीमती संगिता साळुंखे (माई) यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एस. बोंगाळे,,डॉ. एन. ए. पाटील,डॉ.डी.पी.जाधव, प्रा. पी. एस. कराडे, संगम ग्रीन क्लब फॅकल्टी कॉर्डिनेटर डॉ. श्रीमती एस. एम. चव्हाण, ग्रीन क्लब मास्टर ट्रेनर डॉ. जे. यु. दीक्षित, डॉ. ए. बी. मुळीक, प्रा. एम. एस. बागवान तसेच कॉलेजमधील इतर प्राध्यापक, ग्रीन क्लब सदस्य, एन. एस. एस. स्वयंसेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी व बचतगटाच्या महिला बहुसंख्येने उपस्थित होते.

स्थळ- मौजे किवळ,

दिनांक- १५ ऑगष्ट, २०२४

---

प्रभारी प्राचार्य,
वेणूताई चव्हाण कॉलेज,
कराड.

**वेणूताई चव्हाण कॉलेज,कराड**

**राष्ट्रीय सेवा योजना आयोजित**

वेणूताई चव्हाण कॉलेज स्थापना १ मे १९७१ कराड

**एक पेड माँ के नाम (वृक्ष लागवड)**

दि. 15 ऑगस्ट **2024**





**‘एक पेड माँ के नाम’** या योजनेअंतर्गत 130 वृक्ष उतरताना स्वयंसेवक



‘**एक पेड माँ के नाम’** या योजनेअंतर्गत 130 वृक्ष लागवडीसाठी तयार



वृक्ष लागवड करताना मा.प्र.प्राचार्य प्रा.( डॉ.) एस.आर.सरोदे



वृक्ष लागवड करताना स्वयंसेवक व सदस्य



वृक्ष लागवड करताना एन.एस.एस. सदस्य

वेणुताई चव्हाण कॉलेज
स्थापना
१ मे १९७१
कराड




वृक्ष लागवड करताना स्वयंसेवक



**वृक्ष लागवड करताना केंद्रीय दिशा समिती, नवी दिल्ली च्या सदस्य व किवळ गावच्या महिला प्रतिनिधी श्रीमती संगिता साळुंखे (माई) तसेच किवळ गावच्या बचतगटाच्या महिला.**



**वृक्ष लागवड करताना केंद्रीय दिशा समिती, नवी दिल्ली च्या सदस्य व किवळ गावच्या महिला प्रतिनिधी श्रीमती संगिता साळुंखे (माई)**

वेणूताई चव्हाण कॉलेज
स्थापना
१ मे १९७१
कराड




**वृक्ष लागवड करताना मा. प्र. प्राचार्य प्रा. (डॉ.) एस. आर. सरोदे,**
**केंद्रीय दिशा समिती, नवी दिल्ली च्या सदस्य श्रीमती संगिता साळुंखे (माई) व**
**एन. एस. एस. चे कार्यक्रम अधिकारी व सदस्य**

महाराष्ट्र शासन

वृक्षवृध्दी, सर्वत्रसमृध्दी

# विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, सातारा यांचे कार्यालय

'वनसंपदा' नविन प्रशासकिय इमारत फॉरेस्ट कॉलनी जवळ गोडोली सातारा ४१५ ००१

दुरध्वनी क्र. ०२१६२-२९५१०९ E-Mail - dfosatara@gmail.com

क्रमांक - ब/सावनि/योजना/रोपे विक्री /2024.25/९२६८; सातारा 415001 दिनांक- 13.08.2024

**ज्ञापन**

विषय — वन महोत्सव कालावधीमध्ये वृक्षलगावड करणेकरीता रोपे उपलब्ध करुन मिळणेबाबत.

संदर्भ- १. सरपंच, ग्रामपंचायत कोपर्डे हवेली ता. कराड जि. सातारा यांचे कडील दिनांक- ०२.०८.२०२४ चे पत्र

२. प्राचार्य वेणूताई चव्हाण कॉलेज कराड ता. कराड जि. सातारा यांचे कडील दिनांक- ०९.०८.२०२४ चे पत्र

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्रमांक १ व २ अन्वये रोपे मागणी अर्ज प्राप्त .झाले आहेत ते आपल्या अवलोकणार्थ या सोबत पाठविणेत येत आहे. त्याचे अवलोकण व्हावे , वृक्षलागवडीसाठी उपरोक्त संदर्भान्वये रोपे मागणी केली आहे.

त्याअनुषंगाने वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कराड यांना कळविण्यात येते की, सन २०२४ च्या पावसाळयात लागवड करणेकरीता रोपे मागणी केली आहे. तरी सदर प्रकरणी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.सावनि/-२०२४ प्र.क्र.-२९/फ-११ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १८ जून २०२४ नुसार आवश्यक ती नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. संबंधित अर्जदार यांचेकडून शासन निर्णयातील विहित रोपे मागणी अर्जामध्ये मागणी घ्यावी व ती या कार्यालयास सादर करावी ,केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत - सहपत्र वरील प्रमाणे.

(एच.एस.वाघमोडे)
विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण, सातारा

प्रति ,
वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,
कराड

# वृत्तपत्रातील बातमी



किवळ : वृक्षारोपणप्रसंगी उपस्थित संगीता साळुंखे व इतर.

## किवळ येथे वड, पिंपळसह विविध प्रकारच्या १३० रोपांची लागवड

**कराड : पुढारी वृत्तसेवा**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडच्या उच्च शिक्षण मंडळ, कराडचे वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडमधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व संगम ग्रीन क्लब यांच्यावतीने किवळ ता. कराड येथे १३० वृक्षांचे रोपण करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून, झाडे लावा झाडे जगवा हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी किवळ येथे वड, पिंपळ, चिंच, करंज, नारळ, सीताफळ, पेरू अशी विविध स्वरूपाची १३० वेगवगेळ्या प्रकारची झाडे लावली.

यावेळी केंद्रीय दिशा समिती नवी दिल्लीच्या सदस्य श्रीमती संगिता साळुंखे व वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडच्या प्रभारी प्राचार्य श्रीमती डॉ. एस. आर सरोदे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एस. बोंगाळे व महिला, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

ऐक्य
गुरुवार २२/०८/२०२४ अंक २१७ ४ ₹ पाने १०
श्रावण कृ. ३, शके १९४६, नक्षत्र उत्तर भाद्रपदा * संकष्ट चतुर्थी चंद्रोदय रात्री
सूर्योदय - ०६:१९:२२ सूर्यास्त - १८:५४:०४ | उद्या अग्निहोत्र वेळ सातारा | सूर्योदय-०६:१९:३४ सूर्यास्त-१८:५३:२१ | चंद्रोदय - २०:५९:५४ चंद्रास्त - ०८:४१:२२



वृक्षारोपणप्रसंगी सौ. संगीता साळुंखे, डॉ. एस. आर. सरोदे यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी.

## किवळ येथे वेणूताई चव्हाण कॉलेजच्यावतीने वृक्षारोपण

कराड, दि. २१ : येथील वेणूताई चव्हाण कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व संगम ग्रीन क्लब यांच्यावतीने किवळ, ता. कराड येथे वृक्षारोपण करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी वड, पिंपळ, चिंच, करंज, नारळ, सीताफळ, पेरू अशा विविध प्रकारच्या १३० झाडांचे रोपण केले. यावेळी केंद्रीय दिशा समिती, नवी दिल्लीच्या सदस्य संगीता साळुंखे, कॉलेजचे प्रभारी प्राचार्या डॉ. एस. आर सरोदे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एस. बोंगाळे, डॉ. एन. ए. पाटील, डॉ. डी.पी.जाधव, प्रा. पी. एस. कराडे, डॉ. ए. बी. मुळीक, प्रा. डॉ. एस एम. चव्हाण, प्रा. एम. एस. बागवान, ग्रीन क्लबचे डॉ. जे. यू. दीक्षित, सुनील साळुंखे, बचतगटाच्या महिला, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.